# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ३० जुलै, २०१५ / श्रावण ८, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

### वरळी, मुंबई येथील बी.डी.डी. चाळींच्या देखभाल-दुरुस्तीसाठी देण्यात आलेल्या निधीत झालेला गैरव्यवहार

**(१) * २६८०५ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथील बी.डी.डी. चाळींच्या देखभाल-दुरुस्तीसाठी देण्यात आलेल्या निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, मुंबई व अधीक्षक अभियंता, सा.बा. मंडळ, मुंबई यांना सविस्तर चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याकरिता कळविण्यात आले असून चौकशी प्रगतीपथावर आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जळगांव येथील जिल्हा कृषी औद्योगिक सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुकीत झालेला गैरव्यवहार**

**(२) * १९९९९ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा कृषि औद्योगिकच्या सर्व सेवा सहकारी संस्था, जळगांव या संस्थेच्या निवडणूकीकरिता उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख संपल्यानंतरही अर्ज मागे घेण्यात आल्याबाबतच्या तक्रारी मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २८ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने सदर गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले,

(३) तसेच तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव या कार्यालयास दिनांक २८/०३/२०१५ रोजी याबाबत तक्रार अर्ज प्राप्त झालेला आहे.

(२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांनी दिनांक ०१/०४/२०१५ रोजी चौकशीचे आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांनी दिनांक १६/०७/२०१५ रोजी चौकशी केली असून चौकशी अहवाल सादर केलेला आहे. चौकशी अहवालानुसार तक्रारदार श्री. गुंजाळ यांनी विहित कालावधीत दिनांक २५/०३/२०१५ रोजी माघार घेतलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात औद्योगिक विकासाकरिता परिपूर्ण**
**उद्योग धोरण आखण्याबाबत**

**(३) * १७९४८ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य उद्योग क्षेत्रात अग्रेसर रहावे याकरिता राज्याचे परिपूर्ण उद्योग धोरण आखण्यात यावे असे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ८ मे, २०१५ रोजी सह्याद्री अतिथीगृहामध्ये एमआयडीसी अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये मा.उद्योगमंत्री यांच्या उपस्थितीत दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०८/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत मंत्रीमंडळ उपसमितीची बैठक दि. ८ मे, २०१५ रोजी घेण्यात आली होती. सदर बैठकीत “मेक इन महाराष्ट्र” व “Ease of doing Business” या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला होता.

(२) “मेक इन महाराष्ट्र” अंतर्गत उद्योग निर्मितीसाठी विविध ना-हरकती व परवाने देण्याकरिता प्रक्रिया सुलभ करणे व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करणे यासाठी विविध विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा सदर बैठकीत घेण्यात आला.

(३) “मेक इन महाराष्ट्र” या उपक्रमाच्या अंतर्गत पाठपुराव्याअंती राज्य शासनाने खालील उल्लेखनीय प्रगती केली आहे.

(i) राज्यात उद्योग स्थापन करण्याच्या प्रक्रियेमध्ये घटकाची गुंतवणूक, उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे ठिकाण इत्यादीच्या आधारे ढोबळमानाने ६४ ते ६६ परवाने लागत असत, आता सुलभीकरणांतर्गत त्यांची संख्या ही ४८ ते ४६ इतकी करण्यात आली आहे. ऑटो उद्योगांना एमआयडीसी क्षेत्रात ३७ व एमआयडीसी क्षेत्राबाहेरील जागेवर ४२ परवाने लागत आहेत. तसेच स्टील उद्योगांनाही अनुक्रमे ४१ व ४६ परवाने लागत आहेत.

(ii) ऊर्जा विभागाकडून देण्यात येणारी विद्युत जोडणी परवाना देण्यासाठी लागणाऱ्या मंजुऱ्यांची संख्या ७ वरुन ३ इतकी कमी केली असून सदरची परवानगी देण्यासाठीचा कालावधी ६७ दिवसांवरून १५ इतका कमी केला आहे व रस्ता न ओलांडता द्यावयाच्या विद्युत जोडणी परवान्याचा कालावधी ७ दिवस इतका कमी केला आहे.

(iii) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या परवानग्यांची संख्या १४ वरुन ५ इतकी कमी केली आहे.

(iv) २० हजार चौ.मी. पेक्षा जास्त बांधकाम असणा-या औद्योगिक बांधकामासाठी पर्यावरण विभागाच्या ना-हरकतीची आवश्यकता असणार नाही.

(v) नदी नियमन धोरण फेब्रुवारी २०१५ पासून रद्द करण्यात आले आहे.

-----------------

**नांदगांव पेठ (जि.अमरावती) औद्योगिक वसाहतीमधील प्रकल्पांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याबाबत**

**(४) * १६८५२ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील नांदगांव पेठ औद्योगिक वसाहतीमधील प्रकल्पांमध्ये आस्थापना व पर्यवेक्षीय श्रेणीमध्ये ८० टक्के स्थानिकांना रोजगार देण्यात यासह अन्य मागण्यांचे निवेदन सन्मा. मुख्यमंत्र्यांना देण्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगाव पेठ येथील औद्योगिक क्षेत्राकरिता आसपासच्या परिसरातील गावकऱ्यांच्या जमिनी अत्यंत कमी दराने संपादीत करण्यात आल्यामुळे त्यांना वाढीव मोबदला देवून प्रकल्पग्रस्त कुटुंबातील व्यक्तीला औद्योगिक क्षेत्रात कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अमरावती यांनी शासनामार्फत भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण करुन दिनांक २०/०३/१९९७ रोजी अंतिम निवाडा पारीत करुन संबंधीत भुधारकांना मोबदल्याची रक्कम वाटप केलेली आहे.

तसेच कलम १८ खालील व कलम २८ अ नुसार देय रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार भूधारकांना व्यवसायाकरिता १०० चौ.मी. जमिनीचा भुखंड सवलतीच्या दराने वाटप करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हा परिषदेच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करण्याबाबत

**(५) * २२६४८ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाअंतर्गत सन २०१४-१५ या वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे (दलित वस्ती सुधार योजना) या योजनेअंतर्गत कामांना मंजुरी देताना जिल्ह्यातील ग्रामपंचायतीकडून संबंधित पंचायत समितीमार्फत प्रस्ताव न मागविता व यासंबधी असलेल्या शासनाच्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे उल्लंघन करुन मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामांचे प्रस्ताव प्राप्त नसताना संबंधीत कामांची मंजुरी कोणत्या आधारावर देण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक गावातील लोकसंख्या विचारात घेऊन ग्रामपंचायतीच्या ठरावासह दलित वस्तींची संख्या निश्चित करुन गावनिहाय प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्राप्त करुन घेवून हिंगोली जिल्ह्यातील १०६९ वस्त्यांचा एकत्रित बृहत आराखडा तयार करुन त्यास अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेवून जिल्ह्यातील दलित वस्त्या घोषित करण्यास मान्यता घेतली आहे. तसेच ग्रामपंचायतीचा वेगळा प्रस्ताव न घेता, बृहत आराखड्यात सुचविल्याप्रमाणे अद्याप लाभ न दिलेल्या वस्त्यांमधील कामांची निवड प्राधान्याने शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंगांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. लावण्याबाबत

**(६) * २३१२१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. बसवण्याचे शासनाचे आदेश असतानाही अपंगाच्या शाळांनी तसेच विशेष चालविल्या जाणाऱ्या शाळांनी उक्त आदेशाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदरील शाळांमध्ये अद्यापही सी.सी.टी.व्ही. लावले नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग व विशेष मुलांसाठी चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील साठ्ये महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्क आकारल्याबाबत

**(७) * २७१८२ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साठ्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य व अधिकारी यांनी संगनमत करुन २००९ ते २०१४ यादरम्यान समाजकल्याण विभागाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्क आकारणे आदि गैरप्रकार करुन शासनाची आणि विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्राचार्य डॉ. कविता रेगे यांनी आपल्या महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यासंदर्भात अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अन्वये कर्तव्ये पार पाडण्यासाठी हयगय केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) साठ्ये महाविद्यालयाविरुध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर यांनी तपासणी पथक स्थापन करुन चौकशी केली.सदर चौकशीमध्ये महाविद्यालयाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शुल्क वसुल केल्याचे निदर्शनास आल्याने महाविद्यालयाच्या प्राचार्याविरुध्द दिनांक २१/२/२०१५ रोजी विलेपार्ले पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यात संजय गांधी व श्रावणबाळ अर्थसहाय्य योजनेच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत

**(८) * २७०९६ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यात निराधारांसाठीच्या संजय गांधी व श्रावणबाळ अर्थसहाय्य योजनेच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी तिमाही बैठका बोलवा असा शासनाचा आदेश असूनही येथील प्रशासनाने माहे मे, २०१५ अखेरपर्यंत बैठका घेतल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गतच्या लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता दि. २६ मे, २०१५ रोजी बैठक घेण्यात आली असून सदर बैठकीत प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## जळगांव जिल्हयातील महिला सहकारी संस्थांवर अवसायकाची करण्यात आलेली नियुक्ती

**(९) * २३९०९ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपसाना महिला सहकारी उद्योग उत्पादक सोसायटी, सप्तशृंगी महिला ग्राहक सहकारी संस्था, महालक्ष्मी माता महिला सहकारी औद्योगिक सोसायटी (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील संस्थांचा व्यवहार गुंडाळण्याबाबत मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी दि. २०.६.२०१३ रोजी मध्यंतरी आदेश देऊन अवसायकाची नियुक्ती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवसायकाने उक्त संस्थांची सर्व पुस्तके कागदपत्रे व दप्तर ताब्यात घेतले नसल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिलेल्या पत्रातून निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्था चालकांनी कोणतेही लेखापरिक्षण केलेले नसतानाच मा.सहाय्यक निबंधकानी दि. २२.१२.२०१४ रोजी मध्यंतरी आदेश विलोपित केल्याची बाब उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब १, २ व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(५) तसेच उक्त प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

अपसाना महिला सहकारी उद्योग उत्पादक सोसायटी लि. भुसावळ आणि महालक्ष्मी माता महिला सहकारी औद्योगिक सोसायटी लि. भुसावळ या संस्थेचे दि. ३१.०३.२०१४ अखेरचे लेखापरिक्षण झालेले आहे व सदर दोन संस्थांचे मध्यंतरीय आदेश सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ यांचे दि.०८.०१.२०१५ रोजीच्या आदेशाने विलोपित करण्यात आले आहे. सप्तश्रृंगी महिला ग्राहक सहकारी सोसायटी लि. भुसावळ, जि.जळगांव या संस्थेचे लेखापरिक्षण झालेबाबतचा अहवाल सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ यांना अद्याप प्राप्त झालेला नाही. तसेच सदर संस्थेचे उपरोक्त मध्यंतरीय आदेश विलोपित करण्यात आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुत्तरडोह (ता.मालेगांव, जि.वाशिम) येथील ठक्करबाप्पा योजनेअंतर्गत मंजुर कामात बदल करणेबाबत

**(१०) * १७२६४ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुत्तरडोह (ता.मालेगांव, जि.वाशिम) येथे बंद गटार व नाली बांधकाम करणे हे काम ठक्करबाप्पा योजने अंतर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षात मंजुर करण्यात आलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद गटार व नाली बांधकामाऐवजी सिमेंट रस्ता घेणेबाबत गावक-यांनी ग्रामसभेचा ठराव करुन अंशतः बदल करुन मिळणेबाबतचा अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचेकडे दिला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामात अंशतः बदल करुन मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक २९ मे, २०१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली तसेच सदर अंशतः बदलास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव गत दोन वर्षापासून अप्पर आयुक्त, आदिवासी, अमरावती यांचेकडे प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) मौ. कुत्तरडोह, ता.मालेगांव, जि.वाशिम येथील बंद गटार व नाली बांधकाम करणेबाबतच्या कामास सन २०११-१२ या आर्थिक वर्षात मंजूरी देण्यात येऊन त्याकरिता प्रकल्प अधिकारी, अकोला मार्फत कार्यकारी अभियंता, वाशिम यांना रु.१० लाख इतका निधी वितरित करण्यात आला होता. तथापि, सरपंच, मौ.कुत्तरडोह यांनी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ग्रामसभेचा ठराव घेऊन बंद गटार व नाली बांधकामाची आवश्यकता नसल्यामुळे त्याऐवजी सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम मंजूर करावे असा प्रस्ताव सादर केला.

ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या शासन निर्णयानुसार प्रस्तावित केलेले काम त्याच आर्थिक वर्षामध्ये करावयाचे असल्याने सन २०११-१२ या आर्थिक वर्षात मंजूर केलेले काम सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात करता आले नाही. मात्र, सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकामासाठी रु. १० लाख इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक सध्याच्या दरसूचीनुसार तयार करण्याचे काम कार्यकारी अभियंता, वाशिम यांच्या स्तरावर प्रगती पथावर आहे.

----------------

**मोर्शी (जि.अमरावती) येथे अनुसुचित जाती व नवबौध्द मुलामुलींसाठी शासकीय निवासी शाळा सुरु करण्याबाबत**

**(११) * २७८६४ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा-मोर्शी (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे अनुसूचित जाती व नवबौध्द मुलामुलींसाठी शासकीय निवासी शाळा सुरु करण्यात यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचेकडे दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधीचा प्रस्ताव दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी शासनास सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

मौजा मोर्शी (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे अनुसूचित जाती व नवबौध्द मुलामुलींसाठी शासकीय निवासी शाळा सुरु करण्याबाबत दि. १८/०४/२०१५ रोजी निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) नाही.

(३) याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान न मिळाल्याबाबत**

**(१२) * १७५८२ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान तीन महिने न मिळाल्याने अंध, अपंग, कुष्ठरोगी, विधवा, वयोवृध्द यांनी तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील अंध, अपंग इ.ना दरमहा वेळेत संजय गांधी अनुदान देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीमध्ये अनुदान प्राप्त न झाल्याबाबत अपंग सेवा संघ यांनी दि. २७ एप्रिल, २०१५ रोजी निवेदन दिले होते. सदर अनुदान तात्काळ द्यावे अन्यथा उपोषण करण्यात येईल असेही निवेदनात नमूद केले होते.

(२) दि. २२.०६.२०१५ पासून माहे फेब्रुवारी, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीचे अनुदान वितरण सुरु करण्यात आले आहे. तसेच, लाभार्थ्यांना दरमहा वेळेवर अनुदान वाटप करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणास देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येवला (जि.नाशिक) येथील शासकीय वसतिगृह इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(१३) * १८२७९ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) , श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव):** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे आदिवासी विकास विभागाकडून मुलांच्या आणि मुलींच्या शासकीय वसतिगृह इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता

मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २३ शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाची अंदाजपत्रके व आराखडे माहे जुलै, २०१३ पासून प्रशासकीय मान्यतेअभावी शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे वसतिगृहांअभावी होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी प्रश्न भाग (१) व भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) सद्यस्थितीत शासनस्तरावर एकूण ६४ वसतिगृह इमारत बांधकामाचे आराखडे प्राप्त झाले असून त्यापैकी २६ अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठविण्याची कार्यवाही या विभागामार्फत सुरु आहे. १६ अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठविली आहेत तसेच उर्वरित २२ अंदाजपत्रकांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. अशा अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) शासनास प्राप्त सर्व अंदाजपत्रकांवर प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान परस्पर लाभार्थ्यांच्या खात्यातून काढण्यात आल्याबाबत

**(१४) * २६१०५ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना बँकेमार्फत वाटप केले जाणारे अनुदान परस्पर लाभार्थ्यांच्या खात्यातून काढण्यात आल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थीचे अनुदान परस्पर खात्यातून काढणारी टोळी कार्यरत असल्याचा संशय लाभार्थीकडून व्यक्त करण्यात येत असून यासंदर्भात शासनाने

चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना बँकेमार्फत वाटप केले जाणारे अनुदान परस्पर लाभार्थ्यांच्या खात्यातून काढण्यात आले नाही मात्र सिल्लोड तालुक्यात संजच गांधी निराधार योजनेअंतर्गत बँकेमध्ये अखर्चित असलेली रु.३,४०,८०० एवढी रक्कम माहे डिसे. २०१३ ते माहे एप्रिल, २०१४ या कालावधीमध्ये सेल्फ चेकद्वारे आहरीत केल्याचे निदर्शनास आले आहे. व या गैरप्रकारास कारणीभूत असलेले संबंधित नायब तहसिलदार व अव्वल कारकून यांना निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे तसेच सदरची रक्कम संबंधिताकडून शासन खाती भरणा करुन घेतली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजुरा (जि.चंद्रपूर) येथे दलित वस्ती सुधार योजनेच्या काम वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) * २६४०२ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, राजुरा (जि.चंद्रपूर) येथे मंजूर दलित वस्ती सुधार योजनेच्या काम वाटपात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे कंत्राट थेट ग्रामपंचायतीला देण्याचे आदेश संवर्ग विकास अधिकारी, राजुरा यांनी दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ नुसार रु.३ लक्ष वरील कामाचे इ.निविदा पध्दतीने कंत्राट काढण्याचे शासन निर्णय असतांनाही थेट ग्रामपंचायतीला ई-निविदा न करता कंत्राट वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व कंत्राट वाटप करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२), (३) व (४) चंद्रपूर जिल्हा परिषदे अंतर्गत राजुरा पंचायत समितीच्या स्तरावरुन दलीत वस्तीच्या कामाचे कंत्राट देण्यात आलेले नाहीत. तसेच सन २०१४-१५ मध्ये मंजूर कामासाठी साहित्य खरेदी ही ई निवीदा पध्दतीने ग्रामपंचायत स्तरावर करण्यात आलेली आहे. आणि अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेतर्गत काम वाटपामध्ये कोणताही गैरव्यवहार झाला नाही. सबब कोणत्याही अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पारंगी (ता.जि. यवतमाळ) येथे औद्योगिकीकरणासाठी संपादित केलेली शेतजमीन मूळ मालकांना परत मिळण्याबाबत

**(१६) * २५२५९ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पारंगी (ता.जि.यवतमाळ) येथील १०-१२ शेतक-यांची शेतजमीन औद्योगिकीकरणासाठी १९९७ मध्ये संपादित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेव्हापासून मूळ शेतमालकांना व इतरांना काही मोबदला अल्पस्वरुपात तर काहीना मोबदला मिळालाच नसल्यामुळे शेतक-यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे पारंगी (ता.जि. यवतमाळ) येथील शासनाने औद्योगिकीकरणासाठी शेतक-यांकडून संपादित केलेली शेतजमीन मूळ मालकास परत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.मदत व पुनर्वसन मंत्र्यांना दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे पांगरी, जि. यवतमाळ येथील संपादित केलेल्या क्षेत्राचा अंतिम निवाडा दि. ३/११/१९९७ रोजी जाहीर केला असून, त्याअनुषंगाने संबंधित भूधारकांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला वाटप करण्यात आला असून संपूर्ण क्षेत्राचा ताबा महामंडळाकडे प्राप्त झालेला आहे.

(३) मौजे पांगरी (ता.जि.यवतमाळ) येथील औद्योगिकीकरणासाठी शेतकऱ्यांकडून संपादित केलेली जमिन मूळ मालकास परत मिळण्याबाबतचे दि. ६/०४/२०१५ रोजीचे निवेदन मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यात ओटीएसपी कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुनही विकास कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) * १७४६१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात ओटीएसपी कार्यक्रमांतर्गत शासनाने आदिवासी भागातील विकासकामांसाठी एक कोटी १० लाख रुपये निधी उपलब्ध करुन दिला, मात्र जिल्हा परिषदेने उशीरा निविदा काढल्याने माहे मार्च अखेरपर्यंत ही कामे झाली नसल्यामुळे पुल, रस्त्यांची कामे प्रलंबित असून ८८ लाख रुपयांचा निधी शिल्लक असतानाही ही कामे अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रलंबित विकास कामे पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय, अंशतः खरे आहे.

हिंगोली जिल्ह्यात ओटीएसपी कार्यक्रमांतर्गत शासनाने १ कोटी १० लाख रु. निधी उपलब्ध करुन दिला असून त्यामधून सद्यःस्थितीत एकूण ७ कामांपैकी २ कामे पूर्ण झाली असून उर्वरित ५ कामे प्रगतीपथावर आहेत. वित्त विभाग शासन निर्णय, दि. ६/६/२००८ नुसार जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला निधी पुढील आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्यास परवानगी असल्यामुळे प्रगतीपथावरील कामे पुर्ण करण्याचे नियोजन जिल्हापरिषद, हिंगोली यांनी केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील मतिमंद शाळेच्या संस्था चालकांनी केलेला गैरव्यवहार

**(१८) * १७४१२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने पनवेल (जि.रायगड) येथील भारतीय मानव विकास संस्था याच्यातर्फे चालविण्यात येणाऱ्या मतिमंद शाळेत संस्थेचे चालक यांनी बनावट कागदपत्रे तयार करणे, विशेष शिक्षक-शिक्षिकेच्या नेमणुका आणि त्यांच्या हजेरीपटाबाबत खोट्या नोंदी करणे, विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बनावट सह्या करणे अशा माध्यमातून लाखो रुपयांचे सरकारी अनुदान व शिष्यवृत्तीच्या रकमा घेतल्याचे दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने उपरोक्त शाळेच्या संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) सदर प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने अंतिम चौकशी अहवाल मा. न्यायालयास सादर केला आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) मा. न्यायालयास सादर केलेल्या चौकशी अहवालातील शिफारशी विचारात घेऊन आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी आवश्यक कारवाई करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांना निदेश दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील संत एकनाथ सहकारी साखर कारखान्यातील निवृत्त कर्मचाऱ्यास निवृत्तीचा लाभ देण्यात आला नसल्याबाबत

**(१९) * २६६५७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील संत एकनाथ सहकारी साखर कारखान्यात काम करणारा कर्मचारी सन २००५ मध्ये निवृत्त झाला असता त्यास माहे मे, २०१५ अखेर

निवृत्तीचा लाभ देण्यात आला नसल्यामुळे साखर कारखान्याचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना दोन महिन्याची शिक्षा मा.न्यायालयाने सुनावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) मा. कामगार न्यायालयाने संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि., एकनाथनगर ता. पैठण जिल्हा औरंगाबाद या कारखान्याचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक यांना संबंधित कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचा लाभ देणेबाबतचे आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाविरुध्द संबंधितांनी औद्योगिक न्यायालय, औरंगाबाद येथे अपिल दाखल केले असून दि. १०/६/२०१५ रोजी मा. कामगार न्यायालयाच्या आदेशास स्थगिती दिलेली आहे. प्रकरण सध्यास्थितीत न्याय प्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यानी केलेला गैरव्यवहार

**(२०) * २६६१३ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दोन्ही कार्यालयांमधील मनमानी कारभाराच्या चौकशीसाठी आलेल्या मंत्रालय स्तरावरील उच्चस्तरीय अधिका-यांच्या पथकाने केलेल्या तपासणीत दोन कार्यकारी अभियंता व एक प्रभारी कार्यकारी अभियंत्यांच्या काळातील कागदपत्रे गायब झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अहवाल समितीने शासनाकडे पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात औद्योगिक वसाहतीतील उद्योग कायमस्वरुपी बंद असल्याबाबत**

**(२१) * २७०९८ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात ४२५ एकरावर मुसळगाव तर सुमारे एक हजार एकरावर माळेगाव औद्योगिक वसाहतीतील सुमारे २५० उद्योग कायमस्वरुपी बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक विनावापर पडून असल्याने सदरचे उद्योग सुरु करण्याकरिता शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सिन्नर तालुक्यात एमआयडीसी एरिया माळेगांव येथील सुमारे १२९० एकर व सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत (स्टाईस) मुसळगांव येथील सुमारे ४२५.२२ एकर असे एकूण १७१५.२२ एकर एवढे औद्योगिक क्षेत्र आहे.

सन २००८ च्या लघु उद्योगाच्या चौथ्या प्रगणनेच्या सर्वेक्षणानुसार माहे मार्च २००७ अखेर नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यातील बंद आढळलेल्या एकूण घटकांची संख्या सुमारे २३४ एवढी आहे.

उद्योग बंद होण्याची कारणे :- व्यवस्थापनातील अभाव, आर्थिक पाठबळ नसल्याने कच्च्या मालाचा अभाव, बाजारातील चढउतार यामुळे उद्योग बंद पडले आहेत.

(२) शासनातर्फे आजारी लघु उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी ज्या सोयी सवलती देण्यात येतात त्यामध्ये अविकसित भागातील आजारी लघु उद्योगांना वाढीव सवलती शासन निर्णय, दिनांक २१/०४/२००१ व दिनांक ०७/०६/२००१ अन्वये देण्यात येतात. तसेच औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवन्क्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी विशेष अभय योजना (Special Amnesty Scheme) शासन निर्णय, दिनांक ०२/०५/२०१३ व दिनांक १४/०८/२०१४ नुसार सन २०१३ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत राबविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे शहरात गतिरोधक बनविताना बांधकामाच्या**
**निकषाचे उल्लंघन केल्याबाबत**

**(२२) * २५४७० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात होणारे अपघाती मृत्यू आणि शारिरीक त्रासास कारणीभूत ठरणारे गतिरोधक बनवितांना बांधकामाचे कुठलेही निकष पाळण्यात आले नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनचालकांना लक्षात येण्यासाठी अशा गतिरोधकांवर पांढऱ्या रंगाचे तिरकस पट्टे अथवा रेडियमचे पट्टे मारलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) शासनाने या नियमबाह्य गतिरोधक बनविणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) नाही. हे खरे नाही.

धुळे शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यावर टाकण्यात आलेल्या गतिरोधकांना अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, गतिरोधक समिती, धुळे यांची मंजूरी घेण्यात आली आहे. तसेच गतिरोधकावर आवश्यकतेनुसार विहीत कालावधीनंतर पांढऱ्या रंगाचे तिरकस पट्टे अथवा रेडीयमचे पट्टे मारले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-न्हावरे-यवत-चौफुला (ता.दौंड) या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत**

**(२३) * २६०८४ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-न्हावरे-यवत-चौफुला (ता.दौंड) या रस्त्याच्या चौपदीकरणाच्या कामाला मंत्रीमंडळाच्या पायाभूत विकास समितीने माहे मार्च, २०१० मध्ये वा त्या दरम्यान मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामास माहे मार्च, २०१० मध्ये मंजूरी मिळूनही रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-न्हावरे-यवत-चौफुला (ता.दौंड) या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक प्रशासन व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, हिवाळी अधिवेशन डिसेंबर-२०१४ मध्ये कपात सूचना क्र. ४२ नुसार मागणी करण्यात आलेली होती.

(४) भूसंपादन कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) वरीलप्रमाणे.

-----------------

**झाराप (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील जिवदान मतिमंद विशेष शाळेला अनुदान मिळण्याबाबत**

**(२४) * २३८९४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झाराप (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या जिवदान मतिमंद विशेष शाळेला अनुदान मिळण्याबाबत लोकप्रतिनिधीनी

दिनांक २६ मार्च २०१५ रोजी मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री यांना पत्र देऊन विनंती केल्यानंतर त्यांनी आयुक्त अपंग कल्याण पुणे यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० नोव्हेंबर, २००५ पासून अनुज्ञाप्ती प्राप्त झालेल्या सदर शाळेला अनुदान मंजूर करण्याबाबत आतापर्यंत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

(२) जिवदान विशेष मतिमंद शाळा, झाराप (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) हया विशेष शाळेस दि.१०.११.२००५ रोजी कायम विनाअनुदान तत्वावर अनुज्ञप्ती लायसन्स देण्यात आलेले आहे.

कायम विनाअनुदान तत्वावरील शाळांना अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबत सद्य:स्थितीत शासनाचे कोणतेही धोरण अथवा शासन निर्णय नाही. त्यामुळे सदर संस्थेला अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर शहरातील सावेडी नाक्याजवळ सामाजिक न्याय भवन उभारण्याबाबत

**(२५) * २०७८५ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरातील सावेडी नाक्याजवळ ७ कोटी रुपये खर्चुन सामाजिक न्याय भवन उभारण्याचे मा.पालकमंत्री यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय भवनाचे स्वरुप कसे असणार आहे,

(३) असल्यास, सामाजिक न्याय भवनाचे काम सुरु करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) शासन धोरणानुसार प्रत्येक जिल्हयामध्ये बांधण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनामध्ये या विभागाची क्षेत्रिय कार्यालये, विभागाच्या अखत्यारितील महामंडळे, जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग, सभागृह, वाचनालय इ. चा समावेश आहे.

(३) नाही.

(४) मौजे-सावेडी, जि-अहमदनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत वास्तुमांडणी आराखडयावर सक्षम प्राधिकारी यांची संमती घेऊन, त्यानुसार नियोजित इमारतीचे बांधकाम हाती घेण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वडपे (ता.भिवंडी) ते कसारा (जि.ठाणे) दरम्यान भुयारी मार्ग उभारण्याबाबत**

**(२६) * २७२२३ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : तारांकित प्रश्न क्रमांक १२३३८ दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वडपे (ता.भिवंडी) ते कसारा (जि.ठाणे) दरम्यान भुयारी मार्ग/उड्डाणपूल/सर्विसरोड उभारण्यासाठीच्या केंद्र शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मंजूरी मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली, तसेच सदर मार्गावर होणारे अपघात व प्रवाशांच्या मृत्युचा विचार करता, त्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या आवश्यक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सवलत करारनाम्याच्या वावात समाविष्ट नसलेल्या काही कामासाठीच्या केंद्र शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास तत्वत: मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) अतिरिक्त कामाच्या वावाच्या प्रस्तावास भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेण्यासाठी, सवलतदारास तपशीलवार अंदाजित खर्च सादर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

महामार्गावरील प्रश्नाधीन लांबीमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने, अपघात प्रवण क्षेत्रांच्या ठिकाणी रम्बलर स्ट्रीप्स, झेब्रा पट्टे, कॅट आईज आणि ब्लिंकर्स लावण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे वेगमर्यादेचे फलक, माहिती तसेच सावधानतेचे दर्शक फलक

उभारण्यात आले आहेत. घाटभागामध्ये, उंच भरावाच्या ठिकाणी क्रॅश बॅरिअर्स, वळण भागावर थर्मोप्लास्टिक पेंटिंग, अशा उपाययोजना केलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील दोन परवानाधारक सावकारांनी कर्जमुक्तीचा प्रस्ताव दाखल न केल्याबाबत**

**(२७) * २५८६१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परवानाधारक सावकरांकडून घेतलेले कर्ज संबंधित सावकाराला देऊन शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याचा निर्णय शासनाने हिवाळी अधिवेशनात घेतला आहे, परंतु वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील दोन परवानाधारक सावकारांपैकी एकानेही कर्जमुक्तीचा प्रस्ताव दाखल न केल्याची माहिती माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे तालुक्यातील सुमारे ३ हजार ६८३ शेतकऱ्यांना फटका बसणार असून या शेतकऱ्यांवर ३ कोटी ५२ लाख ९० हजार रुपयांचे कर्ज आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सावकारांशी मध्यस्थी करुन त्यांच्याकडून कर्जमुक्तीचे प्रस्ताव निर्धारित वेळेत सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) परवानाधारक सावकारांकडून शेतक-यांनी घेतलेले कर्ज माफीच्या दि.१०.०४.२०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार वैजापूर तालुक्यातील दोन परवानाधारक सावकाराकडून मे, २०१५ मध्ये २६९ शेतक-यांना मुद्दल रु. ५५.७७ लाख व त्यावरील व्याज ४.६० लाख असे एकूण रु.६०.३८ लाख इतकी कर्जमाफी देण्याचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.
(२) दि.३०.११.२०१४ अखेर वैजापूर तालुक्यातील दोन परवानाधारक सावकाराचे ३,०५४ कर्जदारांकडून एकूण रु.३२८ लाख इतके कर्ज येणे बाकी होते. त्यापैकी दि.३०.०६.२०१५ अखेर ६६८ पात्र शेतकरी कर्जदारांचे मुद्दल रु.९५.७४ लाख व त्यावरील व्याज ९.२५ लाख असे एकूण रु.१०४.९९ लाख रकमेचे कर्जमाफीचे प्रस्ताव प्राप्त झाले असून सदर प्रस्तावास जिल्हा स्तरीय समितीने मंजूरी दिली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील निराधार योजनांचे लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(२८) * २२९६७ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील श्रावणबाळ, संजय गांधी यासारख्या विविध निराधार योजनांच्या समित्या स्थापन करण्यात आलेल्या नसल्यामुळे निराधार योजनांचे लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे तालुक्यातील श्रावणबाळ योजनेचे १८५ व संजय गांधी योजनेचे १४० अशा एकूण ३२५ लाभार्थ्यांची प्रकरणे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे तालुक्यातील निराधार योजनेतील लाभार्थ्यांना तहसील कार्यालयात वारंवार जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) या तालुक्यातील श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचे १८५ व संजय गांधी निराधार योजनेचे १४० अशी एकूण ३२५ अर्जदारांची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

अर्जदाराच्या मंजूरी/नामंजुरीबाबत प्रकरणांचा तलाठ्यामार्फत संबंधित लाभार्थ्यास सूचना देण्यात येतात.

(४) व (५) विविध निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे संजय गांधी योजना समितीची बैठक आयोजित करता आली नाही. मात्र सद्यस्थितीतील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक, २०१५ ची आचारसंहिता संपल्याबरोबर सदर प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

----------------

## अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता समर व्हेकेशन कोर्सेस सुरु करण्याबाबत

**(२९) * २०२३३ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता समर व्हेकेशन कोर्सेस सुरु करण्याचा निर्णय समाजकल्याण अधिकाऱ्यांनी घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेमार्फत या कोर्सकरिता अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा शोध घेतला जात असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानास पात्र ठरलेल्या अपंग विशेष शाळांना अनुदान निधी देण्याबाबत

**(३०) * १७६५८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८९ मतिमंद, १७ अस्थिव्यंग, १४ मुकबधिर व ३ अंध प्रवर्ग मिळून 'अ' श्रेणीतील १२३ शाळा व कर्मशाळा अनुदान पात्र झाल्या आहेत, शासनाच्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या शाळांनाच शंभर टक्के अनुदान देण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने अनुदानास पात्र ठरलेल्या या अपंग विशेष शाळांना अनुदान निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने दि.८.४.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. तद्नंतर तपासणीअंती सदर संस्थांना अनुदान वाटप करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यात आदिवासींना मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) * २७६९३ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली मतदार संघासह रत्नागिरी जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या ३६०० असूनही मागील पाच वर्षात शासनाने त्यांना मुलभूत सोईसुविधा देण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी आतापर्यंत किती निधी खर्च केला आहे व त्यातून कोणती कामे करण्यात आली आहेत,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) गेल्या ५ वर्षात शासनाने रत्नागिरी जिल्ह्यासाठी जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनांवर रु. ३९७.३१ लक्ष खर्च केला असून दापोली मतदारसंघासह रत्नागिरी जिल्ह्याचे कार्यक्षेत्र आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्र (ओटीएसपी) असल्याने त्या ठिकाणी मुलभूत सोयीसुविधा पुरविता येत नाहीत.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत परवान्याचे नुतनीकरणामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३२) * २४०८० डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : तारांकित प्रश्न क्रमांक १४०५१ ला दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत खरेदी दारांकडे माहे मार्च, २०१५ पर्यंत सेस थकीत असलेल्या खरेदीदाराकडून व्याजाच्या रक्कमेची वसुली न करता त्यांच्या परवान्याचे नुतनीकरण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परवान्याचे नुतनीकरण करण्यात अनियमितता झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनियमितपणे परवान्याचे नुतनीकरण करणा-या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही. ज्या खरेदीदारांनी मुद्दल सेसच्या रकमेचा भरणा केलेला आहे त्यांच्या परवान्याचे नुतनीकरण केलेले आहे. व्याजाच्या रकमेच्या वसुलीबाबत महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन अधिनियम १९६३ अंतर्गत लवाद दाखल आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगाव (जि.जळगांव) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील उद्योगासाठी पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याबाबत

**(३३) * २६२७९ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील उद्योगासाठी पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावित पाणी पुरवठा योजनावर अद्यापही निर्णय झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणच्या पाणी पुरवठा योजना मंजुर करुन ती कार्यान्वीत करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.उद्योग मंत्री यांचेकडे दिनांक १४ मे, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

चाळीसगांव औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत गिरणा नदीवरील जामदा बंधारा येथून कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येणार असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व सदर कामाच्या निविदा दि.०४/०६/२०१५ रोजी उघडण्यात आल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) चाळीसगांव औद्योगिक क्षेत्रासाठी पाणी पुरवठा योजनेसंदर्भात भाग (२) येथे नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आल्याबाबत

**(३४) * २५६१७ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेमधील २९०० सभासद/लाभधारक रद्द करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भुदरगड तहसिलदार सौ.ओसवाल यांनी कोणतीही नोटीस न काढता लाभधारकांना अपात्र ठरविले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच गरीब पेन्शन धारकांची पेन्शन बंद करणा-या तहसिलदार व संबंधित सर्व अधिकारी यांचे निलंबन करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गतच्या २९३५ अपात्र लाभार्थ्यांचे जानेवरी, २०१५ पासून अनुदान बंद केले आहे.

(२) विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनातील लाभार्थ्यांची पात्रता तपासणी वर्षातून एकदा करण्यात यावी या शासनाच्या धोरणानुसार व जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या निर्देशानुसार विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गतच्या लाभार्थ्यांचे सामाजिक सर्वेक्षण करतेवेळी (अपात्र शोध मोहीम) लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ, अपत्य सरकारी/खाजगी नोकरीस, वयाचा खोटा पुरावा, कमावती मुले व कुटुंब स्थलांतरीत होणे इ. बाबी निदर्शनास आल्याने २९३५ अपात्र लाभार्थ्यांचे अनुदान बंद केले आहे. सदर सर्वेक्षण करतेवेळी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी भुदरगड तालुक्यातील सर्व संबंधित लाभार्थ्यांच्या घरी जाऊन, चौकशी करुन छाननी तक्ता भरुन घेऊन त्यावर लाभार्थ्यांच्या स्वाक्षरी/अंगठयाचे ठसे घेतलेले आहेत. तसेच अपात्र लाभार्थ्यांची यादी गाव चावडीवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बेस्टच्या परिवहन उपक्रमास पथकरामधून सवलत देण्याबाबत

**(३५) * २७७३३ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्टचा परिवहन उपक्रम सद्य:स्थितीत तोट्यात सुरु असून बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीबाहेर ७०० बसगाड्यांचे प्रवर्तन होत असून वाशी, ऐरोली, मुलुंड (पूर्व व पश्चिम), दहिसर, घोडबंदर या टोल नाक्यावर होत असलेल्या पथकर आकारणीमुळे दरवर्षी सुमारे १० कोटी रुपयांचा भार बेस्ट उपक्रमास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टच्या परिवहन उपक्रमास पथकरातून सवलत मिळण्यासाठी उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक (MSRDC) यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने बेस्ट उपक्रमांस पथकरातून सवलत देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अशा आशयाचे बेस्ट उपक्रमाचे पत्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास प्राप्त झाले आहे.

वाशी, ऐरोली, मुलुंड (पूर्व व पश्चिम), दहिसर, घोडबंदर या टोल नाक्यावर शासनाच्या पथकर अधिसूचनेनुसार पथकर वसूली सुरु आहे.
(३) याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन त्यानंतर उचित निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्तभाव देण्यासाठी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३६) * १७९५० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्तभाव देण्यासाठी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने मदत करावी यासाठी मा.सहकार मंत्री यांनी मा.केंद्रीय कृषीमंत्री यांचेकडे दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच, राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मा. मंत्री (सहकार) यांनी दिनांक १५/०४/२०१५ चे निवेदनान्वये मा. केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना राज्यातील साखर उद्योगास आर्थिक सहाय्य देण्यासाठी मागणी केलेली आहे.
(२) वरील निवेदनाद्वारे राज्यातील साखर उद्योगासाठी अबकारी कर्ज, बफर स्टॉक निर्मिती, मुदत कर्जाची पुनर्रचना, साखर दरातील चढउतार निधी (SSF), बिनव्याजी कर्ज इ. मुद्यांबाबत धोरणात्मक निर्णय होणेस विनंती केली आहे.

(३) राज्यातील ऊस उत्पादक शेतक-यांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने खालीलप्रमाणे मदत केली/ करण्यात येत आहे.

१. राज्य शासनाने सन २०१३-१४ व २०१४-१५ या हंगामाचा ऊस खरेदी कर माफ केलेला आहे.

२. केंद्र शासनाने दि. २७.२.२०१५ च्या अधिसुचनेनुसार १४ लाख मे. टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रति मे.टन रु. ४०००/- प्रमाणे अनुदानाचा निर्णय घेतला आहे.

३. राज्य शासनाने दि.२३.६.२०१५ चे शासन निर्णयानुसार राज्यातील साखर कारखान्यांनी हंगाम सन २०१४-१५ मध्ये उत्पादित केलेल्या कच्च्या साखरेच्या निर्यातीस रु.१०००/- प्र. मे.टन प्रमाणे निर्यात अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

४. केंद्र शासनाने सन २०१४-१५ चे हंगामातील FRP अदा करणेसाठी रु.६०००/- कोटीचे पॅकेज जाहीर केलेले असून दि. २३.६.२०१५ चे अधिसूचनेनुसार सॉफ्टलोन योजना लागू केली आहे. दि.२३.६.२०१५ चे अधिसुचनेतील अटी शर्तीनुसार पात्र काराखान्यांना मंजुर होणा-या कर्ज रकमेवर १०% प्रमाणे होणा-या पहिल्या वर्षाच्या व्याजाचा भार केंद्र शासन उचलणार आहे. त्यापुढील ४ वर्षासाठी व्याज अनुदान राज्य शासनाने देण्याचा निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये सुवर्ण लघु उद्योग योजनेंतर्गत केवळ चार गाळ्यांमध्ये उद्योग सुरु असल्याबाबत

**(३७) * २६१६८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये लघु उद्योजकांना उद्योग करण्यासाठी सुरु केलेल्या सुवर्ण लघु उद्योग योजनेतून अडीच एकर जागेवर बांधलेल्या २४ गाळ्यांपैकी चार गाळ्यांमध्येच उद्योग सुरु असून बाकीचे सर्व गाळे मोडकळीस आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी नवीन उद्योजकांनी गाळा घेतल्यास नवीन बांधकामावर दुप्पट खर्च होणार असल्यामुळे उद्योजक या ठिकाणी येण्यास तयार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोडकळीस आलेले वीस गाळे पाडून त्या जागी मोठ्या उद्योजकाला जागा उपलब्ध केल्यास जागेचा पूर्ण वापर होवून औद्योगिक विकास महामंडळाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग क्रमांक ३ बाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये सुवर्ण लघु उद्योग योजनेअंतर्गत २४ शेडचे (गाळयांचे) बांधकाम करण्यात आले असून, त्यापैकी ५ शेड वाटप करण्यात आले आहेत व १९ शेड अद्याप वाटपासाठी उपलब्ध आहेत.

सदर क्षेत्रात वाटपासाठी उपलब्ध असलेले १९ शेडचे नवीन बांधकाम न करता, फक्त दरवाजे व खिडक्यांची डागडुगी/दुरुस्ती केल्यानंतर त्यांचा वापर उद्योजकांकरीता होवू शकतो.
(३) व (४) सदर औद्योगिक क्षेत्रात वाटपासाठी उपलब्ध असलेले १९ शेड हे सलग नाहीत. तसेच लिलाव पध्दतीने गाळे वाटपाचे महामंडळाचे धोरण आहे. तथापि, एखाद्या मोठया उद्योजकाने आहे त्या स्थितीत सदर शेड घेण्याची तयारी दर्शविली व त्यांनी महामंडळाकडे तशी मागणी केल्यास त्याबाबत महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करता येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३८) * २६६२४ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत (क्र.१) कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंत्यासह उपअभियंता, शाखा अभियंत्यांनी सन २०१३-१४ या वर्षात शासकीय कर्मचाऱ्यांची निवासस्थाने व विविध शासकीय कार्यालयातील दुरुस्ती व रंगरंगोटीच्या कागदोपत्री कामाच्या माध्यमातून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार उक्त प्रकरणी संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) व (३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांना सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ऐरोली (नवी मुंबई) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाचे काम पूर्ण न झाल्याबाबत

**(३९) * २०८२३ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली (नवी मुंबई) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाचे बांधकाम मागील पाच वर्षापूर्वी सुरु होऊनही भवनाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याचे दि.१६/५/२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाचे काम अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त भवनाचे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच भवनाचे कामाबाबत दिरंगाई करणा-या संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या बांधकामासाठी ऐरोली (नवी मुंबई) ऐवजी कळवा (ठाणे) येथे जागा उपलब्ध झाली आहे.

(२) व (३) दि.११/२/२०१३ रोजी सदर जागेची मोजणी झालेली आहे.

कळवा (ठाणे) येथील भवनाच्या बांधकामाची संकल्पचित्रे मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून खर्डी ते कसारा परिसरातील शेतकऱ्यांची पीक कर्जासाठी होत असलेली अडवणूक**

**(४०) * २०३०३ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील खर्डी ते कसारा परिसरातील सर्वच कर्जबाजारी शेतकऱ्यांनी गेल्यावर्षी अल्प मुदतीत पीक कर्जाची १०० टक्के परतफेड केली असतानाही नवीन पीक कर्जासाठी ठाणे जिल्हा बँकेकडून नविन ७/१२ व अन्य कागदपत्रे जमा करण्यासाठी शेतकऱ्यांची अडवणुक होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेच्या या अडवणूकीमुळे या शेतकऱ्यांनी आत्महत्येचा पवित्रा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या बँकेच्या मनमानी कारभाराबाबत संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील आडे फाटा ते कादिवली हा रस्ता दुरुस्त करण्याबाबत

**(४१) * २७६९४ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील आडे फाटा ते कादिवली हा रस्ता मागील २० वर्षापासून जिर्ण व नादुरुस्त असून वाहतूकीस पूर्णपणे अयोग्य झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व पुणे येथून येणाऱ्या पर्यटकांकरिता आंजर्ले-केळशी आडे इ.निसर्गरम्य पर्यटन स्थळांना जोडणारा हा एकमेव रस्ता असल्याने रहदारी वाढली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याकरिता मागील १० वर्षात किती निधीची तरतूद केली, त्यातील खर्चीत व अखर्चीत निधीचा तपशील काय आहे व त्यातून कोणती कामे करण्यात आली आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त रस्ते अद्यापही वाहतूकीस अयोग्य असल्याने सदर रस्त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करुन उक्त रस्त्याची कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) विषयांकीत रस्त्याची लांबी २९.१०० कि.मी. असून मागील १० वर्षात एकूण रु. १२३.६२ लक्षची तरतूद झाली असून रु.१२३.६२ लक्ष खर्च झाला आहे. त्यामध्ये ८ कि.मी. लांबीच्या रस्त्याची सुधारणा करण्यात आली आहे.

(४) सद्यस्थितीत सदरहू रस्त्याच्या कि.मी. १८/४०० ते २३/३०० या नादुरुस्त लांबीपैकी १.३० किमी लांबीचे रु. ३०.०० लक्षचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत लांबी मध्ये उपलब्ध निधीच्या अधिन राहून कामे हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील जिल्हा सहकारी बँकेच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पीक कर्ज देण्याबाबत

**(४२) * २६४४० श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील जिल्हा सहकारी बँकेच्या थकबाकीदार शेतकऱ्यांनाही खरीप हंगामासाठी पीक कर्ज देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची राज्यात अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी-निपाणी हा राज्यमार्ग वाहतूकीच्यादृष्टीने धोकादायक असल्याबाबत

**(४३) * २६४९५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी-निपाणी हा राज्यमार्ग वाहतूकीच्यादृष्टीने धोकादायक असून माहे डिसेंबर, २०१४ पासून माहे मे, २०१५ अखेर या रस्त्यावर झालेल्या अपघातात ३२ जण ठार झाले असून १३६ जण गंभीर जखमी झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी-निपाणी राज्यमार्ग क्र. १७८ कि.मी. १५/००० ते १३६/३८५ (कर्नाटक राज्यहद्द) एकूण ४१.३८५ कि.मी. ही लांबी सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांचेकडे देखभाल व दुरुस्तीसाठी आहे. या लांबीमध्ये

सन १/१२/२०१४ ते ३१/५/२०१५ अखेर राधानगरी पोलीस स्टेशन यांच्या अंतर्गत १४ अपघात झाले असून ३ मयत व ४९ जखमी झाले आहेत. तसेच मुरगूड पोलीस ठाणे अंतर्गत ६ अपघात झाले असून ३ मयत, १ गंभीर जखमी व २ किरकोळ जखमी झाले आहेत. अशा प्रकारे एकूण २० अपघात झाले असून त्यात ६ मयत व ५२ जखमी झाले आहेत.

अपघात झालेल्या ठिकाणाचा रस्ता हा धोकादायक आहे हे दर्शविणारे आवश्यक ते फलक रस्त्याच्या वळण ठिकाणी लावण्यात आलेले आहेत.

(२) सदर रस्ता वाहतूकीस सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवेळी करण्यात येत असतात. अपघात झालेल्या ठिकाणी असणारा रस्ता हा धोकादायक आहे हे दर्शविणारे आवश्यक ते फलक रस्त्याच्या वळणाच्या ठिकाणी लावण्यात आलेले आहेत. अपघातप्रवण ठिकाणे सुधारणेसाठी आवश्यक त्या उपाययोजना निधी उपलब्धता व निकषांप्रमाणे करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रामलिंग विकास सेवा, पाचर्डे (ता. भुदरगड, जि.कोल्हापूर) या संस्थेचा निवडणूक कार्यक्रम नियमाचे उल्लंघन करुन सहायक निबंधक यांनी जाहिर केल्याबाबत**

**(४४) * २६८२६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामलिंग विकास सेवा, पाचर्डे (ता. भुदरगड, जि.कोल्हापूर) या संस्थेचा निवडणूक कार्यक्रम सहायक निबंधक पोवार यांनी नियमांचा भंग करुन जाहिर केल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहायक निबंधक, भुदरगड यांनी ३ वेळा चुकीच्या ऑर्डर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत वारंवार तक्रारी करुन तसेच स्थानिक नागरिकांनी आमरण उपोषण केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा नियमांचा भंग करणाऱ्या सहायक निबंधक पोवार यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर संस्थेच्या सन २०१५-२०२० या कालावधीतील समिती निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०१/२०१५ च्या आदेशान्वये निवडणुक कार्यक्रम मंजूर केलेला आहे.

(२) तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांनी दोन वेळा अधिसूचना निर्गमित केली असून, सदर कार्यवाही चूकीची असल्याचे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

(३) होय.

(४) राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांनी प्रस्तावित केलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.